# प्रभुतरुण

| वर्ष ४८ | अंक २ | मुंबई | ऑगस्ट २०१४ | पाने ६ | किंमत रु. १ |
|---|---|---|---|---|---|

(*स्थापना :* तारीख २५ ऑगस्ट १९२३)

**तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?**

**www.prabhutarun.org**

*संपादिका:* **सुहासिनी कीर्तिकर** *कार्यकारी संपादक मंडळ :* **मिनाक्षी जयकर, मयुरा नायक, संजना कोठारे, वैजयंती कीर्तिकर**


*संपादकीय*

## अवघे पाऊणशे वयमान

**—सुहासिनी कीर्तिकर**

पाठारे प्रभु महिला समाजाचे हे शंभरावे वर्ष. याच वर्षात सौ. वृंदा जयकरांचा पंच्याहत्तरावा वाढदिवस असावा हा मणिकांचन योगच. त्या महिला समाजाच्या अध्यक्ष. सोशल समाजाच्या विश्वस्त. तीन ऑगस्ट हा त्यांचा जन्मदिन. 'वाढदिवस' असं मुद्दामच म्हटलं नाही. कारण त्या रोजच वाढत असतात, विकसित होत असतात. म्हणजे रोजच त्यांचा खऱ्या अर्थी 'वाढदिवस' असतो. त्यांच्या वाढदिवसाचा पंच्याहत्तरावा सोहळा होणारच आहे. (त्याचा वृतांत इतरत्र या अंकात असेलच.) पण या सोहळ्याचे आगळेपण म्हणजे त्याच्यावरील लेखांच्या पुस्तकाचे प्रकाशन यावेळी होणार आहे. या पुस्तकात माझाही लेख आहे. तो वाचकहो, आपण वाचालच. मग ते लेखन संपादकीयात पुन्हा देण्यात काय हशील? पण तरीही या अंकातही त्यांच्यावर लिहावेसे वाटले. हीच खरी खासियत. कारण अनेक संस्थांना, माणसांना त्या आपल्या वाटतात. परभू 'तितुका मेळवावा!' हे त्यांचे जगण्याचे सूत्र आहे. त्यामुळे कोणत्याही चांगल्या कामाला त्या जबरदस्त आत्मविश्वासाने भिडतात. मग डॉ. वैजयंती यांच्यावर त्यांनी नुकतीच केलेली 'रेकी' असो, वा परदेशी विद्यार्थ्यांना या वयातही शिकवणं असो. खुशवंतसिंग वयाच्या पंच्याण्णवाव्या वर्षीही प्रचंड कार्यरत होते. लेखन करणे, परखड मते मांडणे, आपल्या 'चैनी' विषयी दिलखुलासपणे सांगणे... असं ते उत्साहाने भरभरून करीत. महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी शंभराव्या वर्षी 'भारतरत्न' पदवी स्वत: जाऊन, ताठ मानेने घेतली. त्यानंतरही ते कार्यरत होते. सांगण्याचा मतलब असा की जो मनापासून समाजकार्य करतो, स्वेच्छेने 'परोपकाराय पुण्याय' स्वत:ला वाहून घेतो त्याला वयाच्या मर्यादा पडतच नाहीत. आपल्याच ज्ञातीत पहा ना! नव्वदीनंतरही श्री. प्रताप वेलकर संशोधनकार्यात मग्न आहेत. लेखनधर्म पाळताहेत. अनेक संस्थांचा भाग असलेले रवींद्र मानकर 'अजून फक्त दहा वर्षे' अशा सहजतेने कार्यरत राहून नव्वदीचा उंबरा ओलांडताहेत. आपल्या ज्ञातीतील देवानंदच ते! (आपल्या युवामंचच्या युवकांनी त्यांना ही पदवी बहाल केली आहे!) वीरपाल राणे 'चॅरिटीज'शी आपले समीकरण कायम जुळवून आहेत. आता जाणेयेणे नाही समजा जमत; पण म्हणून काय झालं? ते सर्व कामे घरी बसून पूर्वीच्याच शिस्तीनं आणि आत्मीयतेनं करत आहेत. डॉ. गजानन विजयकर हे 'चॅरिटीज'चे विश्वस्त आहेत. 'मेडिकल कॅम्प' ते उत्साहाने घेत असतात.

तर वृंदाताई; पंच्याहत्तर म्हणजे काहीच नाही. 'अजून यौवनात मी' अशीच तुमची कार्यशक्ती आणि धडपड आहे. प्रभुतरुणाच्या वाढदिवसाला अनेक वर्षे तुम्ही आणि श्री. शाम न चुकता केक आणता आहात. गेल्या वर्षी काही कारणाने तुम्हाला खुद्द येणं जमलं नाही समारंभाला. पण केक? तो मात्र याच्या त्याच्या हस्ते आलाच. शिवाय तुमची आणखी एक खासियत. प्रभुतरुणाच्या दरवर्षी वाढत्या वयानुसार एकेक रुपयाची भर घालून तुमच्याकडून देणगी असते. माझ्या मुलीच्या- वैजयंतीच्या लग्नसमारंभात मी कुणाकडून अहेर घेतला नाही. पण तुम्ही काय केलंत? तिच्या हातात प्रेमभराने एक छोटंसं चॉकलेट ठेवलंत. त्याला 'अहेर' तरी कसं म्हणायचं? तुमच्या अशा छोट्याछोट्या वाटणाऱ्या कृतींनी तुम्ही परस्परा संबंधातली, वागण्यातली गोडी नेहमीच वाढवली आहे. चॉकलेट हे कृत्रिम रसायनानं बनलेलं अवीट चवीचं. पण तुमच्या वागण्यातील हा अकृत्रिम प्रेमभाव त्याहूनही अवीट चवीचा. अशा वागण्याने तुम्ही 'प्रेमबेली' वाढवता. मग ती बहरते.

विशेषत: संस्थात्मक कार्यात अशी वेल बहरणे अधिक मोलाचं असतं. सातत्यानं अध्यक्षपदावर विराजमान होणं हे त्यामुळंच तुम्हाला साध्य झालं आहे. तुम्हाला समाजकार्याची हौस आहे, कार्यात्म शिस्त आहे, संस्थात्मक राजकारणाचं भान आहे, संस्थेला पुढं न्यायचं तर एकटयानं नाही; सर्वांनी पुढं जायला हवं यावर तुमचा विश्वास आहे, अपार उत्साह आहे आणि मुख्य म्हणजे हेच तुमचं जगणं आहे. म्हणूनच वृंदाताई, वयाची पंच्याहत्तरी म्हणजे या सगळ्या कार्यासाठी गाठलेला आयुष्याचा छोटासा टप्पा आहे. खात्री आहे, वयाची शंभरी गाठतानाही तुम्ही अशाच भरभरून 'जगणार' आहात. महिला समाजाची शंभरी साजरी होतेय् यावर्षी. एकशे पंचविसाव्या म्हणजे शतकोत्तर रौप्य महोत्सवी सोहळ्यातही तुम्ही याच उत्साहानं सामील असालच. कदाचित् विश्वस्त म्हणून, कदाचित् हितचिंतक म्हणून!

तुमच्या पंच्याहत्तरीनिमित्त तुम्हाला शुभेच्छा. लहान मुलांचे नाही का; आपण पहिला, पाचवा, दहावा, सतरावा असे वाढदिवस दिमाखाने साजरे करतो. तसाच हा तुमच्या पंच्याहत्तरीचा आयुष्यमान टप्पा दिमाखात साजरा होत आहे. तुम्हाला 'प्रभुतरुणा'कडून मन:पूर्वक शुभेच्छा.

आता तर यानिमित्त तुम्ही प्रभुतरुणाच्या आश्रयदात्याही झालात. तुमची भूमिका बदलली. त्यामुळे आश्रयदाता म्हणून 'प्रभुतरुणा'ला कायम प्रेमाचा आश्रय मिळेल याची मनोमन खात्रीच आहे मला. वारकरी ज्याप्रमाणे एकमेकांना लहानमोठा भेद विसरून ऊराऊरी भेटतात; तसे आपण आता भेटत राहणार आहोत.

या भेटीनिमित्तच्या आनंदाने भरून जाऊन म्हणते, 'तुमचा आनंद, जगण्यातील सुखसमाधान सतत वाढत राहो.'

'प्रभुतरुणा'तर्फे तुम्हाला चिरतरुण शुभेच्छा!

*

## तेथे कर माझे जुळती

तीन ऑगस्ट रोजी बोरीवलीच्या 'बेव्ह्यू'मधली सुरम्य सकाळ. जुन्या-नव्या आठवणीतल्या गाण्यांनी रंगलेली. निमित्त होते सौ. वृंदा शाम जयकरांच्या पंच्याहत्तराव्या दिवसाचे. या वाढदिवसाचे खास वैशिष्ट्य म्हणजे शुभेच्छा देणाऱ्यांच्या मेळाव्यामध्ये वृंदाताईंचे पती श्री. शाम जयकर चाकाच्या खुर्चीत बसून आले ते स्वत:च उत्सवमूर्ती असल्यासारखे. त्यांच्या स्वागताला सर्वांनी टाळ्या वाजवल्या; तर ते उत्स्फूर्तपणे बोलले दोहो हात फैलावून- 'शाम जयकरकी जय हो!' हा त्यांचा उत्साह, जीवनाचा भरभरून आनंद लुटणे यामुळेच वृंदाताईंचा जगण्याचा आनंदझरा खळखळून वाहतो आहे. याप्रसंगी हा आनंद वाढला तो वृंदाताईंवरील पुस्तक प्रकाशनाने. पुस्तकाचे नाव 'तेथे कर माझे जुळती'. याचे प्रकाशन श्री. महेश कोठारे आणि सौ. सुलेखा तळवळकर यांच्या हस्ते झाले. दोघांनीही वृंदाताईंच्या स्वभावाचे पैलू उलगडून दाखवत त्यांचे अभिनंदन केले. या दोघांनीही अतिशय हृद्य अशी भाषणे केली. सौ. जयकरांनी या प्रकाशनावेळी आपले मनोगत व्यक्त केले. आईवडिलांचा कृतज्ञतेने उल्लेख करताना त्यांचा गळा भरून आला. आनंदाच्यावेळी असे कढ जिरवणे साहजिकच असते. जयकरांची सुकन्या सौ. निकीता प्रशांत राणे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. या वाढदिवसाच्या सोहळ्यासाठी तिनेच पुढाकार घेतला होता. असे पुस्तक यावे यासाठी श्री. शीतल तळपदे यांनी पुढाकार घेतला. पुस्तकामध्ये नातेवाईक, समाजातील मान्यवर यांचे लेख आहेत. त्यात वृंदाताईंचे घरचे-दारचे प्रतिबिंब पडले आहे. त्यातील छायाचित्रेही त्यांच्या व्यक्तित्वाला प्रकाशमान करणारी. या वाढदिवसाला केक हवाच ना? तो खास असा बनवला होता सौ. बिबा नायक आणि श्री. हिरेन नायक यांनी. मोठ्ठाच्या मोठ्ठा आणि वृंदाताईंचे व्यक्तित्व दाखविणारा गुलाबी रंगाचा. भोजन आणि हा केक यांनीच नव्हे; तर वृंदाताईंच्या स्वागतशील उबदार सहवासाने या समारंभाची गोडी लज्जतदार केली.

वृंदाताईंच्या आयुष्यातही ही गोडी उत्तरोत्तर वाढत जावो.

*

# पाठारे प्रभु महिला समाज

समाजाची वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दिनांक २३ ऑगस्ट, २०१४ रोजी प्रभु सेमिनरी सभागृह, तळमजला, भाई जीवनजी लेन, ठाकुरद्वार, मुंबई येथे दुपारी ४ वाजता घेण्यात येईल. त्याच दिवशी पुढील स्पर्धा घेण्यात येतील. या स्पर्धा फक्त महिला सभासदांसाठी आहेत.

**स्मरणशक्ती स्पर्धा:** कै. लक्ष्मीबाई धुरंधर स्म., कै. गुलुबाई आनंदराव आगासकर स्म., कै. सौ. कुसुम दत्तात्रय तळपदे स्म. व कै. श्रीमती मोहिनी परिक्षित कोठारे स्मरणार्थ

**निबंध स्पर्धा:** महिलांसाठी- कै. मालतीबाई रामराव कीर्तिकर स्म., कै. श्रीमती सुप्रिया सुरेंद्र वैद्य स्म., कै. सौ. निहारीका विलास कोठारे स्म. व कै. श्रीमती लक्ष्मीबाई माधव प्रभाकर स्मरणार्थ. विषय: नाती

मुलींसाठी- कै. रोहिणी चंद्रकांत विजयकर स्मरणार्थ. विषय: नकोत या परीक्षा (Away with these Exams.)(शब्दमर्यादा ६०० शब्द. निबंध घरून सुवाच्य अक्षरात परिच्छेद पाडून व कागदाच्या फक्त एका बाजूस लिहून आणणे. तसेच निबंधाच्या कागदावर कोठेही आपले नाव लिहू नये.)

काव्य स्पर्धा: कै. सुहासिनी कृष्णराव वाझकर स्मरणार्थ व श्रीमती उषा शिवराज कोठारे पुरस्कृत-विषय: आनंद गीत (काव्य घरून लिहून आणणे. काव्य सुवाच्य अक्षरात कमीतकमी तीन कडव्यात असावे. तसेच काव्याच्या कागदावर कोठेही आपले नाव लिहू नये.)

रविवार, दि. १४ सप्टेंबर २०१४ रोजी दुपारी ४ वाजता पाठारे प्रभु सोसायटीच्या सांस्कृतिक केंद्राच्या सभागृहात, १२वा रस्ता, खार (पू.) येथे संगीत व नृत्य स्पर्धा घेण्यात येणार आहेत. नृत्यस्पर्धा सभासदांच्या मुलांमुलींसाठी आहेत. भाग घेणाऱ्या स्पर्धकांनी दुपारी ३.३० वा. येणे.

**संगीत स्पर्धा:** *महिलांसाठी.* कै. दिवाळीबाई वामनराव विजयकर स्म., कै. सोनाबाई मुकुंद कोठारे स्म., कै. मीना माधव विजयकर स्म., कै. पद्मावती (केशर) शामराव कोठारे स्म., कै. श्री. शरद दत्ताराम देवरूखकर स्मरणार्थ व श्रीमती संगीता नागेश त्रिलोकेकर पुरस्कृत (पहिले बक्षिस)-विषय: लावणी (मराठी)

**संगीत स्पर्धा:** *मुलींसाठी* (१५ वर्षांखालील) श्री. बॉबी नारायण विजयकर पुरस्कृत व श्रीमती संगीता नागेश त्रिलोकेकर पुरस्कृत (पहिले बक्षिस)-विषय: कोळी गीत

नृत्य स्पर्धा: कै. मनोरमा मधुकर कोठारे स्म., (मनोरमा प्राईज), कै. सौ. विमल माधवराव नायक स्म., कै. श्रीमती वेलमती गजानन प्रधान स्म., कै. सौ. रोशन (बेगम) शामराव तळपदे स्म., कै. यशवंतबाई सुंदरराव मानकर स्म., कै. सौ. सुरेखा राणे (ढवळे) स्म., कै. सौ. संध्या सुभाष कोठारे स्म. व कै. श्रीमती नम्रता मल्हार देसाई स्मरणार्थ-विषय: रेकॉर्ड डान्स

मुली: ५ ते ९ वर्ष, १० ते १५ वर्ष

मुले: ५ ते ९ वर्ष, १० ते १५ वर्ष

महिला: १६ ते २५ वर्ष, २६ ते ४० वर्ष, ४० वर्षांवरील.

वेळ: ३ ते ५ मिनिटे (कॅसेट प्लेअरची व्यवस्था केली जाईल)

उत्कृष्ट नृत्याविष्कार व नृत्यदिग्दर्शकालाही पारितोषिक दिले जाईल.

पाठारे प्रभु महिला समाजाचा १००वा स्थापनादिन रविवार दि. २१ सप्टेंबर, २०१४ रोजी दुपारी ४.३० वाजता रवींद्र नाट्य मंदिर, प्रभादेवी येथे साजरा होणार आहे. यावेळी सौ. स्मृती व श्री. शीतल तळपदे प्रस्तुत 'शताब्दी एक्स्प्रेस' हा सांस्कृतिक कार्यक्रम सादर होणार आहे.

या आनंदमयी सोहळ्यात बहुसंख्येने सर्वांनी सहभागी व्हावे ही विनंती!

अधिक माहितीसाठी चिटणीसांकडे संपर्क साधावा. चिटणीस: नीता सेंजित-२८९८५८४८/९८२०१६६६२८

सं. चिटणीस: अक्षदा तळपदे-२२०९५९००/ ९८२०८९४७७०, नूतन कीर्तिकर-२६०४९१५९/९६१९१६८१३१

⁕

## श्री कनकाई देवीचा आश्विन नवरात्र उत्सव

दि. २५-९-१४ ते २-१०-१४ काळात

**स्थळ:**

राजपुरिया बाग, नवीन ठक्कर मार्ग, विलेपार्ले (पूर्व), मुंबई.

**ठळक कार्यक्रम**

देवीची घटस्थापना- २५-९-१४ दुपारी ११.३५ ते १२.३०

अष्टमी हवन- २-१०-१४ सकाळी ९.३० पासून

पूर्णाहूती- संध्याकाळी ५ वाजता

दैनिक आरती- सकाळी ८ वाजता रात्रौ ८ वाजता

ता. क. रोज संध्याकाळी आरतीनंतर महाप्रसादाचे आयोजन केले जाते

निमंत्रक:

उमेशचंद्र कीर्तिकर- ८६५५५२५२५७

तुषार कीर्तिकर-९८१९४२३१९३

⁕

# पाठारे प्रभु सोशल समाज

## सोशल समाजाची अभंगयात्रा

रविवार, दि. १३ जुलै, २०१४ रोजी ठाकूरद्वारच्या पा. प्र. चॅरिटीजच्या व्यंकटेश मंदिरात सोशल समाजाच्या 'अभंगयात्रे'चा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमात ज्ञातीतील सुमारे २० कलाकारांनी हजेरी लावली आणि विठ्ठलचरणी आपली गानसेवा रुजू केली. प्रारंभी समाजाच्या अध्यक्षा श्रीमती स्वाती प्रविण राणे यांनी प्रास्ताविक करून उपस्थितांचे स्वागत केले. 'आपली ज्ञात जशी उत्साही आणि हौशी आहे, तशीच ती श्रद्धाळूही आहे, पण अंधश्रद्ध नाही. आणि म्हणूनच हा अभंगयात्रेचा उपक्रम तब्बल ३०-३१ वर्षे अखंड व अविरतपणे चालू राहिला आहे' असे त्यांनी नमूद केले. समाजाचे विश्वस्त श्री. माधव जयकर यांनी आपल्या मनोगतात अभंगयात्रेचे औचित्य विशद केले. समाजाच्या चिटणीस सौ. नीना सेंजित यांनी त्यानंतर सूत्रे हाती घेतली आणि संपूर्ण अभंगयात्रेचे सूत्रसंचालन उत्तमरीत्या केले. बालकलाकार कु. वरूण राणे यांच्या 'तू सुखकर्ता तू दुखहर्ता' या गणेशस्तवनाने अभंगयात्रेचा प्रारंभ झाला व सौ. रॉनिका विजयकर यांच्या 'भाग्य उजळले तुझे चरण पाहिले' या भैरवीने कार्यक्रमाची सांगता झाली. तत्पूर्वी श्री. विद्युत नायक यांनी सादर केलेले साईबाबागीत श्रोत्यांची वाहवा घेऊन गेले. सर्व गायक-गायिकांना संवादिनीवर श्री. वसंत मोरे व श्री. चंद्रकांत सुतार यांनी साथ केली, तर तबल्यावर श्री. शशिकांत शिवडेकर व श्री.प्रदीप राणे यांनी साथ केली. तालवाद्याची साथ श्री. मांद्रेकर यांची होती.

उपस्थितांना पेढ्यांचा प्रसाद विश्वस्त श्री. अजित तळपदे यांच्याकडून देण्यात आला. तर कॉफी, समाजाच्या उपाध्यक्षा सौ. स्वाती जयकरांनी प्रायोजित केली होती. प्रॅक्टिससाठी श्री. प्रदीप व सौ. मेघना राणे यांनी गिरगाव येथे; तर श्रीमती स्वाती राणे यांनी खार येथे व्यवस्था पाहिली. समाजाच्या उपाध्यक्षा सौ. स्वाती जयकर यांनी अभंगयात्रेसाठी सहाय करणाऱ्या सर्व संस्था, व्यक्ती आणि देणगीदारांचे व गायक कलाकार, साथसंगत करणारे वादक आणि प्रेक्षकांचे आभार मानले. श्रीमती प्रमिला तळपदे यांनी अभंगयात्रेसाठी रु. २०००/-ची देणगी दिली. कार्यक्रमाला प्रेक्षकांची उपस्थिती लक्षणीय होती.

या कार्यक्रमात खालील कलाकारांनी भाग घेतला होता- वरूण राणे, प्रणाली राणे, तन्मयी विजयकर, वीणा अजिंक्य, अमृता कोठारे, योगिता नवलकर, करिष्मा कीर्तिकर, पूजा अजिंक्य, अक्षदा तळपदे, सुरूपा राणे देवरूखकर, रजनी कोठारे, सुहास विजयकर, प्रदीप राणे, रॉनिका विजयकर, सीमा कीर्तिकर, चिंतामणी कीर्तिकर, राजन प्रधान, विद्युत नायक, क्षमा कोठारे व डॉ. हर्षद विजयकर.

⁕

## सोशल समाजाची वर्षासहल

रविवार दि. २० जुलै रोजी समाजाची वर्षासहल 'वाडा' या ठिकाणी आयोजित केली होती. यावर्षी सहलीला येणाऱ्यांची संख्या दुप्पट झाल्यामुळे २ मोठ्या बसेसची व्यवस्था करावी लागली. जवळजवळ ८२ जण सहलीत सहभागी झाले. यात छोटे कंपनींचीदेखील हजेरी होती. वाडा येथे आधी नाश्ता झाला. नाश्ता करून सर्वांची धाव पाण्याच्या दिशेकडे! गाण्याच्या तालावर पाण्यात मनोसोक्त डुंबून नंतर भोजनाच्यावेळी मंडळी परतली. भोजनाचा यथेच्छ समाचार घेतला. त्यानंतर संगीत खुर्ची, पासिंग द पार्सल, हौजी यासारख्या खेळातही सर्वजण सहभागी झाले. अनेकांनी बक्षिसेही पटकावली. खेळाच्या बक्षिसांबरोबरच सर्वात लहान सहभागी कु. रीशिता निलेश देसाई व कु. विवान श्रीपाद आगासकर तर ४ ते १० वयाच्या फरिश्ता व जास्मिन यांनाही भेटवस्तू देण्यात आल्या. तसेच पुण्याहून खास सहभागी झालेले सौ. ज्योत्स्ना व श्री. रंजन धैर्यवान याशिवाय ८० वर्षे वयापेक्षा जास्त वयाचे डॉ. जतिन धुरंधर, श्रीमती विजया कोठारे व श्री. जयपाल कोठारे यांनाही भेटवस्तू देण्यात आल्या. तर सर्वात आधी आपले बुकिंग केल्याबद्दल श्री. नरेंद्र जयकर यांनाही भटवस्तू देण्यात आली. खेळ संपेतोवर चहा-कांदा-बटाटा भजीचा वास सर्वांच्या नाकात शिरला. सर्वांचे पाय त्या दिशेने वळले. तोपर्यंत परतीच्या प्रवासाची तयारी सुरू झाली. सहलीच्या आनंदात सहभागी होण्यासाठी काही वेळ पाऊसराजाही आला. सहलीची गंमत वाढतच गेली. पुन्हा अशीच सहल व्हावी अशी इच्छा व्यक्त करत मंडळी परतली.

⁕

लेखांक ८

# माणूस म्हणून-

## माहेरपण

-डॉ. सुमन नवलकर
(मोबाईल-९८६९०२८९६७)

सावित्री येणार म्हणून गायत्रीने तिच्या आवडीचा स्वैपाक केला होता. माशाची आमटी, भात, सोलकढी, चवळीची उसळ आणि पुरणपोळ्या. मग कटाची आमटी आलीच. अस्सल कोकणी बेत. खरं तर पुरणपोळी सोडली तर सावित्रीच्या घरीही रोज हेच पदार्थ बनत असणार आलटून-पालटून. पण ताई येणार, म्हटल्यावर गायत्रीला तिच्या आवडीचंच जेवण असावंसं वाटलं.

सावित्री पंचाहत्तर तर गायत्री बहात्तर. दोघींमध्येही ताकद आता पूर्वीसारखी नाही. बालपणी कोकणात विहिरीतून पाणी काढून कपडे धुणं, आंघोळी असं सगळं केलं. पण आता गीझर चालू करून खाली बालदी ठेवली तरी खूप काम केल्यासारखं वाटतं खरं. पण आज ताईसाठी जेवण बनवताना गायत्रीच्या अंगी उत्साह संचारला होता. ताईने पण धाकटीच्या श्रमाचं चीज केलं. खूप दिवसांनी दोन घास जास्तच जेवण गेलं तिला. नेमकी त्या दिवशी गायत्री एकटीच घरी होती. नवरा ऑफिसमध्ये लाईफ सर्टिफिकेट द्यायला गेला होता. त्यामुळे जुन्या आठवणी जागवायला दोघींना मोकळीकही मिळाली. जेवल्यावर दोघी लोळल्या. उठून पुन्हा चहा-पाणीही झालं. मात्र संध्याकाळी सावित्री घरी जायला निघाली ती पुन्हा पुन्हा अडल्यासारखी. आधी दोघींनी सोफ्यावर बसून गप्पा मारल्या, मग दारापाशी उभं राहून. मग गायत्री बहिणीला लिफ्टपाशी सोडायला गेली. मग पुन्हा तिथे जिन्यात गप्पा झाल्या. शेवटी लिफ्टमध्ये शिरायच्या आधी सावित्री म्हणालीच, ''खूप मजा आली ग आज. अगदी माहेरी आल्यासारखं वाटलं ग. अगदी निश्चिंतपणे बसावं, जेवावं, कसलं ओझं नाही, जबाबदाऱ्या नाहीत, ताण-तणाव नाहीत. अगदी जाऊच नयेसं वाटतंय बघ.''

''मग नको ना जाऊस ताई. राहा. मी फोन करते भाओजींना आणि सांगते.'' गायत्री म्हणाली.

पण सावित्री गेलीच. मुलगा आणि सून ऑफिसमधून आले असतील. नवरा आपणच चहा करून प्यायला असेल. नात शाळेतून आल्यावर विचारेल, ''आज्जी कुठे गेली?'' सगळे सगळे पाश एका क्षणात तिच्याभोवती वेढले गेले. आणि मग तिने पटकन लिफ्टमध्ये शिरून तळमजल्याचं बटण दाबलंच. लिफ्टमधून बाहेर पडताना तिने ठरवलं की एक दिवस गायत्रीलाही बोलावू आणि करू तिचं माहेरपण. इथे लगेचच गायत्रीचा नवरा आला, पाठोपाठ मुलगा-सून-नातू यायला लागले आणि रोजच्या व्यवहारात ती गुंतून गेली. मनात मात्र विचार होता की खूप दिवसात रूपाली आली नाही. तिला फोन करून म्हटलं पाहिजे की येशील तेव्हा रहायलाच ये. ती कसली येते रहायला? तिचा नवरा पण ऑफिसला जाणार. तिची निकिता पण शाळेत जाणार. त्यांच्या वेळा सांभाळून तिचं स्वत:चं ऑफिस. पण म्हटलं पाहिजे की ती दोघं गेली की एकदा ऑफीसला रजा घेऊन सकाळीच ये. दिवसभर रहा आणि संध्याकाळी जा.

गायत्रीला ठाऊक आहे की आपण असेपर्यंत रुपालीला माहेरपण होणार. मग भावजयीच्या जीवावर कोण येतंय माहेरपणासाठी? रुपालीला बहीण असती तर दोघींनी केलं असतं एकमेकींना माहेरपण. आपण आणि ताई करतोय तसं.

गायत्रीची सून चांगली आहे. रुपालीबरोबर तिचं पटतंही. पण सुनेला स्वत:ला बहीण आहे, आईनंतर तिचं माहेरपण करायला. आपल्यालापण दोघी मुलीच असत्या तर आपल्यानंतर एकमेकींना विसाव्याचे क्षण देत राहिल्या असत्या, 'आपल्यानंतर आपल्या रुपालीला कोणी नाही' अशा वेडगळ विचाराने गायत्रीचे डोळे भरून आले.

''पोहोचले ग नीट.'' सावित्रीचा फोन आला आणि क्षणभर गायत्रीला वाटलं की आपणच ताईची मोठी बहीण आहोत. ताई पंचाहत्तरची झाली आणि आपण बाहत्तरच्या. मग या वयात आपल्याला हे माहेरपण का हवं वाटतंय? खुळेपणाच, नाहीतर काय? माहेरच्या दुप्पट वर्ष सासरी काढली आपण. पण आपली आई गेल्यानंतर रहायला अशा गेलोच नाही आपण माहेरी. बाबा किती बोलवायचे. पण आपण जाऊन त्यांना भेटून यायचो तेवढंच. ''तुम्हीच या बाबा माझ्याकडे'' आपण म्हणायचो. पण तेही कधी यायचे तेव्हा थोडा वेळ बसून निघायचे. म्हणजे आपण बायकाच एकमेकींचं माहरपण टिकवून ठेवतो म्हणायच्या. या विचारावर स्वत:शीच हसून गायत्रीची रोजची कामं चालली होती. पण नाला कसलीतरी हुरहूर लागल्यासारखी वाटत होती.

रात्री काम आटपून गायत्री जरा बसली होती. हात-पाय दुखल्यासारखे वाटत होते. इतकं सगळं केल्यावर हात-पाय दुखणारच ना? पण ताईला भेटल्याचा, ताईबरोबर बालपण पुन्हा जागवल्याचा आनंद मनाला सुखावित होता. तेवढ्यात मंजिरीचा फोन आला. ''गायत्रीकाकी, आज तुझी बहीण यायची होती ना? आली होती का ग? मग मजा आली का ग?'' मंजिरी गायत्रीच्या मोठ्या दिरांची मुलगी. गायत्रीपेक्षा दहा-बारा वर्षांनीच लहान. गायत्रीला अगदी मैत्रिणीसारखीच. दोघींची आठवड्यातून एकदातरी फोनाफोनी होतेच. आई-वडील गेल्यापासून मंजिरीला या काकीचा मोठा आधार वाटतो. सेवानिवृत्त झालेली मंजिरी स्वावलंबी आहे. नवराही सेवानिवृत्त झालाय. मुलं मोठी आहेत. मोठा लग्न झालेला भाऊ आहे. भावजय आहे. पण मंजिरीचं या गायत्रीकाकीशी खूप जुळतं.

''हो ग. आली होती ताई. खूप गप्पा मारल्या. पुरणपोळ्या केल्या होत्या. तुलाही आवडतात ना ग पुरणपोळ्या?'' गायत्री प्रेमाने म्हणाली, ''तू ये एक दिवस मंजिरी. सकाळपासूनच ये. रिटायर्ड तर झालीयस. मग सकाळपासून यायला हरकतच नाही. पुरणपोळ्या करीन मी.'' ''छे ग. माझ्यापेक्षाही दहा वर्षांनी मोठी तू. मलाच होत नाही. हल्ली असलं काही भरजरी करायला. तर तू किती थकत असशील.'' मंजिरीच्या शब्दांनी गायत्रीचे दुखणारे हातपाय थांबलेच दुखायचे क्षणभर. आपल्या या पुतणीला मन मोकळं करायला बहीण नाही, सगळ्या काळज्या चिंता विसरून एखाद्या दिवशी निवांत जाऊन बसायला. तिला आपण बोलावलंच पाहिजे एक दिवस.' या विचारांनी मग गायत्रीचं हुरहुरणारं मन शांत झालं. शरीर तर थकलेलंच होतं. मग झोप यायला काय उशीर?

मंजिरीने फोन ठेवला आणि झोपताना तिच्या मनात विचार आला, आपल्याला एक मुलगा आणि एक मुलगी. मोठी राणी लग्न होऊन सासरी गेलीय. धाकट्या राहुलचं राणीवर खूप प्रेम आहे. पण उद्या त्याचं लग्न झालं की राहील का ते प्रेम टिकून? राणी तिच्या बाबांची, मंदारचीही लाडकी आहे. पण माहेरपण करून घ्यायला राणी येईल का बाबांकडे? मंजिरीचा राणीनंतर राहूल झाला तेव्हा खूश झाली होती ती. पण आज प्रथमच तिला वाटलं की आपल्याला दुसरीही मुलगी झाली असती तर बरं झालं असतं. माझ्यानंतर दोघींनी एकमेकींना माहेरपण केलं असतं.

''बेडलँप लावून काय करतेस मंजिरी? झोपायचं नाही का?'' मंदारच्या या प्रश्नावर मंजिरीने उसासा टाकला. म्हणाली, ''माझ्यानंतर राणीला माहेरपण करशील का रे मंदार?''

''काय पण? कसलं पण?'' मंदारने विचारलं.

''माहेरपण रे मंदार.'' मंजिरीने पुन्हा उसासा टाकला.

''ते काय असतं मंजिरी?'' मंदारने विचारलं.

''कपाळ'' मंजिरीने कपाळाला हात लावला आणि टेबललँप बंद केला.

*

जागेअभावी 'केल्याने देशाटन' हे सदर या अंकात देता आले नाही; याची कृपया नोंद घ्यावी.

## हसरी रेखा

-प्रदीप कोठारे



# युवामंच

## जी आय पी रेल्वे
## कमाल आहे बुवा या इंग्रजांची!

**-संकलक : डॉ. सुरेखा बन्सी धुरंधर**

(सध्या रेल्वे एवढी सुसाट प्रगती करते आहे की ती शहरात आकाशमार्गेही धावू लागली. त्या रेल्वेबद्दलची ही प्रबोधनकार ठाकरे यांनी दिलेली माहिती ज्ञानरंजक ठरावी. -संपादक)

आज आपण देशभरातले जे रेल्वेचे जाळे पाहतो आहोत त्याची सुरुवात एप्रिल महिन्यात १६१ वर्षांपूर्वी मुंबईतून झाली होती. त्या घटनेचे स्मरण करताना त्याकाळी प्रबोधनकार ठाकरे यांनी याविषयी लिहिलेला छोटा लेख इतिहासाविषयी खूप काही सांगतो.

मुंबई प्रांतात रेल्वे असावी असा ठराव मुंबईला प्रथम सर जमशेटजी जिजीभाई आणि जगन्नाथ नाना शंकरशेट यांनी केला. मूळजी जेठा, मोरारजी गोकुळदास, आदमजी पीरभाई डेविड, ससून वगैरे अनेक नामांकित नगरशेटजींचे अर्थात त्यांना पाठबळ होतेच. सन १८५३ मध्ये ग्रेट इंडियन पेनिनसुला रेल्वेचा पहिला छोटा फाटा मुंबई ते ठाणेपर्यंत एकेरी रस्त्याचा तयार झाला. लोखंडी रुळावरून इंग्रज आगीनगाडी चालवणार ही कल्पनाच लोकांना मोठी आचंब्याची वाटली. (या आचंब्यामुळेच 'मुंबईवर्णन' पुस्तकात रेल्वे रुळाला 'लोखंडी सडका' म्हटले आहे!)

अखेर मुहूर्ताचा दिवस जाहीर झाला. दिनांक १८ एप्रिल सन १८५३ सोमवार रोजी सायंकाळी ५ वाजता पहिली आगगाडी मुंबईहून निघाली. पाना, फुलांचे हार, तोरणे, निशाणे लावून १० मोठे खोलीवजा डबे शृंगारलेले, इंजिनावर इंग्रजांचे मोठे निशाण फडकत आहे. डब्यांत गादीच्या खुर्च्या कोच, त्यावर रेल्वेचे सगळे डायरेक्टर, सर जमशेटजी जीजीभाई, नाना शंकरशेट आणि अनेक इतर नगरशेट जामानिमा करून बसलेले. बरोबर ५ वाजता आगगाडीने 'कूक' शिटीचा कर्णा फुंकून आपल्या भकभक फकफक प्रवासाला सुरुवात केली. मुंबई ते ठाणे दुतर्फा लाखावर लोक कलियुगातला हा 'विंग्रेजी' चमत्कार पाहायला आ वासून उभे होते. ना बैल, ना रेडा, ना घोडा आणि वाफेच्या जोरावर एक नाही दो नाही दहा डब्यांची माळका खुशाल चालली आहे. झुकझुक करीत लोखंडी रुळावरून. कमाल आहे बुवा या विंग्रेजांची. आधीच अंग्रेज लोक म्हणजे सीता रामाच्या वरदानाने हिंदुस्थानावर राज्य करायला आलेली. लाल तोंडाची वानरे. त्यांच्यापुढे कोणाचे काही चालायचे नाही अशा थापा क्रिस्ती मिशनऱ्यांनी चोहीकडे लोकांत फैलावलेल्या. आता तर काय विस्तव आणि पाणी यांची सांगड घालून विंग्रेजांनी वाफेलाच गाडी ओढायला लावले. छे छे विंग्रेज लोक खरोखर देवावतार. बिचारा बहुजन समाज तर आश्चर्याने थक्कच झाला.

मुहूर्तावर निघालेली पहिली आगगाडी ठाण्याला जाऊन मुंबईला सुखरूप परत आली. लोकांनी उठाव केला. विचार मांडला. पण त्या वाफेच्या भुताटकीच्या गाडीत बसायला लोकांना धीरच होईना. दुसऱ्या दिवसापासून लोकांना मोफत ठाणे ते मुंबई आणि परत नेण्या-आणण्याची दवंडी पिटण्यात आली. आगगाडीत बसणे धोक्याचे नाही. प्रवास लवकर नि सुखाचा होतो हे लोकांना पटविण्याची रेल्वेच्या कारभाऱ्यांनी खूप आटापीटा केली पण लोकांत भुताटकी आहे. मुंबईला नव्या इमारती नि पूल बांधताहेत त्यांच्या पायांत जिवंत गाडायला फूस लावून माणसे नेण्याचा हा साळसूद डाव आहे- असल्या अफवांपुढे शहाणे प्रचारक काय करणार? एक दोन दिवस सरकारी कचेरीतले पांढरेपेशे कारकून, व्यापाऱ्यांच्या पेढीवरचे गुमास्ते यांना मुंबई ते ठाण्याला नेऊन परत आलेले लोकांना दाखवले. त्यांनी आपले अनुभवही सांगितले. तेवढ्यानेही कोणाचे समाधान होईना.

अखेर दर माणशी एक रुपया इनाम आणि मोफत प्रवासाचा डंका वाजवला. पैशाच्या लालुचीने ठाण्याच्या घंटाळीवरचे आणि मुंबईचे घाटी लोक आगगाडीने जाऊ लागले की त्यांच्या घरची माणसे आजुबाजूला उभी राहून ठणाणा धाय मोकलायची. त्यांची समजूत काढता काढता रेल्वेचे अधिकारी अगदी टेकीला यायचे. एकदा ते प्रवासी ठाणे-मुंबईची सफर करून सुखरूप परत आले म्हणजे मग मात्र चौकशी करणाऱ्यांचे घोळकेच्या घोळके त्यांच्याभोवती जमायचे. रुपयांचे इनाम पुढे आठ आण्यांवर आले नंतर चार आणे झाले. लोकांचा धीर चेपलासे पाहून इनामे बंद झाली नि सर्रास तिकिटे चालू केली. एरवीचा ठाणे मुंबईचा बैलांच्या खटारगाडीचा प्रवास म्हणजे तब्बल एक दिवस खायचा. पण आता काय अवघ्या सव्वा तासात ठाण्याचा आसामी मुंबईला येऊ जाऊ लागला. मग मात्र लोकांची झुंबड उडाली.

इकडे इंजिनिअर लोक कर्जत पळसधरीपासून बोरघाट पोखरण्याची योजना ठरवीत असतानाच खंडाळ्याहून पुण्यापर्यंतचा सपाटीचा रेल्वे रस्ता सन १८५८ च्या फेब्रुवारीत पुरा झाला. त्याचाही मोठ्या थाटामाटाने 'ओपनिंग शिरोमणि' करण्यात आला. खंडाळा पुण्याच्या दरम्यान खडकी आणि तळेगाव अशी दोनच स्टेशन ठेवण्यात आली. रस्ता एकेरीच होता.

बोरघाटाचे काम चालले असतानाच मुंबई-पुण्याचा रेल्वेप्रवास जारीने चालू झाला. कसा ती मौज ऐका आता. पुण्यातली गाडी खंडाळ्याला आली की सगळ्या पासिंजरांना तेथून पालख्या, डोल्या, खुर्च्या नि बैलगाड्यांत बसवून घाटाखाली खोपोलीला आणायचे. ठाकूर-कातकऱ्यांच्या डोक्यांवर त्यांच्या सामानाची ओझी द्यायची. सगळा काफिला खोपोलीला आला का तेथे पुन्हा आगगाडीत बसून झुकझुक करीत खुशाल मुंबईला रवाना व्हायचे. प्रवाशांची ही घाट-उतरणीची सुखसोयी नि सरबराई पाहण्याचे कंत्राट मुंबईच्या करशेटजी जमशेटजी नावाच्या एका पारशी व्यापाऱ्याने घेतलेले होते. घाट - उतरणीचे चार तास धरून पुणे ते मुंबईला रेल्वे प्रवास अवघ्या अठरा तासांत व्हायचा, याचेच ज्याला त्याला नवल वाटायचे.

(वाचू आनंदे मधून साभार)

*

---

## पत्र प्रतिक्रिया

(सौ. उज्ज्वलाताईंची ही पत्रप्रतिक्रिया येऊन काही महिने झाले. पण आत्मस्तुतीचा दोष टाळण्यासाठी चालढकल झाली. मात्र त्यांच्या आग्रहामुळे ही प्रतिक्रिया येथे देत आहे. - *संपादक*)

## ज्ञानाचा खजिना ऊर्फ सुहासिनीताई

**- उज्ज्वला र. ब्रम्हांडकर**

प्रा. सुहासिनी कीर्तिकर हे नाव उच्चारताच एक प्रगल्भ व्यक्तिमत्व डोळ्यांपुढे उभं राहतं. त्या व्यासंगी विदुषी आहेत.

त्यांनी मराठी संस्कृत घेऊन १९६६ मध्ये मुंबई विद्यापीठाची एम. ए. ही पदवी संपादन केली नंतर एलफिस्टन कॉलेजमध्ये त्या प्राध्यापिका झाल्या. विद्यार्थ्यांच्या त्या अत्यंत आवडत्या प्राध्यापिका आहेत ते त्यांच्या शिकवण्याच्या उत्तम हातोटीमुळेच. त्यांना साहित्याची अत्यंत चांगली जाण आहे. कथा, कविता, ललित लेखांमधून एका सशक्त लेखिकेचं दर्शन आपल्याला घडतं. लेखिका, प्राध्यापिका ह्या त्यांच्या रुपाबरोबरच विविध स्पर्धांच्या परीक्षक म्हणूनही त्यांचं एक वेगळं स्थान आहे. साक्षेपी समीक्षक अशी त्यांची कीर्ति आहे. अनेक पुस्तकांना त्यांची समर्थ प्रस्तावना लाभलेली आहे. पुस्तकांच्या अनेक मान्यवर राज्यस्तरीय स्पर्धांकरिता परीक्षक म्हणून त्यांना नेमलं जातं. ह्या सगळ्या उपक्रमांची माहिती सगळ्या अग्रगण्य वृत्तपत्रांमधून 'बातमी' छापून येते ह्यावरूनच त्यांच्या बहुरंगी, बहुआयामी व्यक्तिमत्त्वाची उंची लक्षात येते. ह्या सर्व कीर्तित भर पडते ती 'प्रभुतरुणाच्या संपादकीय'ची. ज्या वृत्तपत्राची सुरुवातच एवढी दमदार आहे त्या प्रभुतरुणाचा अंक दिवसेंदिवस अधिक आकर्षक कसा होईल ह्याकडे त्यांचं बारीक लक्ष असतं. त्यांच्या संपादकीयाची मला कायम भुरळ पडत आली आहे. मी या संपादकीयाबद्दलच येथे बोलणार आहे.

त्यांच्या 'संपादकीय' मध्ये कधी माणसानं माणसाला अंतर्मुख होऊन पाहायची पाळी आली आहे. अशी संस्कारांची वेगळीच परिभाषा त्या नजरेस आणून देतात. 'आमच्या रेषा बोलतात भाषा' ह्या शीर्षकाच्या लेखामध्ये मुलांच्या कल्पनांचे पंख पसरून त्या आपणाला बालमानसिकता दाखवतात. 'मिस्टेकन आयडेंटिटी' ही मानवाची वेगळी आयडेंटिटी त्यांना दिसते. मुलांची भाषा सांगणारी त्यांची कथा केवळ भन्नाटच. कधी निवडणुकांचं राजकारण उलगडताना पूर्व दिव्य ज्याचे त्यांना रम्य भाविकाल हे म्हणता येणं आवश्यक आहे; हे सत्य जाणवून देतात. नाट्य परंपरेतील आघाडीच्या असलेल्या मराठी नाट्यसृष्टीत चालणारी निवडणुकांची नाटकं पडद्यामागची, पडद्यावरची, पडदा पाडणारी, पडदा उघडणारी अशी कितीतरी नाटकं - त्या नाटकांवरचा 'पडदा उघडून' त्या दाखवितात. कधी कीर्तनातून उलगडलेली रंगांची दुनिया उलगडताना तत्त्वज्ञानातून अलगद कवितेच्या जगात जातात. खरा रंगोत्सवाचा अर्थ काय आहे तो विशद करून सांगतात. आणि निसर्गातला रंग दाखवता दाखवताच आत्मरंगात समरसण्याने त्या निरुपणाचा शेवट करतात. ह्या लेखाबद्दल मी लिहायला लागले तर त्यांचा हा अख्खा लेखच पुन्हा पुन्हा उद्धृत करावासा वाटायला लागला इतकी मी त्या रंगांनी बेभान झाले. हा रंग प्रत्यय केवळ अलौकिकच

(पान ५ कॉलम १ वर)

(पान ४ कॉलम ४ वरून)

म्हणावा लागेल. मणेरीकरबुवांच्या कीर्तनातला पुण्यवानाच्या चितेच्या राखेचा रंग क्रूरकर्मा पातक्याला स्वर्गात पोहोचवतो; हा रंगाचा महिमा खरंच अगाध आहे. आपण प्रत्यक्ष त्या कीर्तनाला हजर असतो तरी हे सर्व रंगविश्व आपल्या मनेंद्रियाला उमगले असतेच असं नाही. पण सुहासिनीताईंनी ते आपल्या मनापर्यंत नुसतं पोहोचवलंच नाही तर मनावर कायमचं ठसवलं.

मुलांच्या सुट्टीच्या विश्वाचं दर्शन घडवतानाच आजचे डोरेमान, नोबिता आणि सिझुका खूप वर्षांपूर्वीच्या बालविश्वात अलगद नेऊन त्या बसवतात आणि आपणच नोबिता आणि सिझुका होतो हे लक्षात आणून देतात. तेव्हा आजही आपण आपल्या भूतकाळातल्या बालविश्वात रमून जातो. 'वुई आर ऑन' ह्या लेखात पूर्वीचे रिझल्ट नी आताची रॅटरेस ह्यातली तफावत दर्शवतानाच मुलांना भविष्यातलं कर्तृत्वाचं बूच काढून 'वुई आर ऑन' असं म्हणायला शिकवतात. तार-संस्कृतीतून एस.एम.एस. संस्कृतीत लीलया शिरतात आणि बातम्यांचं माध्यम कसं बदलत गेलं त्याचा इतिहास अगदी थोडक्या वाक्यात समर्पकपणे उलगडतात. तारांमधले विनोद आणि धसका आता कुणालाही अनुभवता येणार नाही ह्याची खंत थोड्याफार प्रमाणात आपल्यालाही जाणवू लागलेली हा लेख वाचूनच.

आचार्य अत्रेंची ओळख नव्यानं घडविणारा लेख केवळ अप्रतिमच. आचार्य अत्रे एक लेखक, एक कवी, नाटककर्ता, उत्तम वक्ता, समर्थ विडंबनकार, एक अग्रगण्य पत्रकार, एक सहृदय माणूस इ. इ. जणूं काही एक परिपूर्ण संस्थाच. अत्रेंबद्दल तपशीलवार वर्णन करणारी लेखणी तेवढीच जबरदस्त असावी लागते नी ती तशी सुहासिनीताईंची आहे ह्यात तिळमात्र शंकाच नाही. आचार्य अत्रेंचं दर्शन एका लेखात समर्थपणानं घडविणारा लेख लिहिणं हे अग्निदिव्यच. पण तेही त्या अतिशय सुरेख रीतीने पार पाडताना दिसतात. प्रभुतरुणाच्या वाढदिवसाचंही अत्यंत प्रत्ययकारी चित्रण त्यांनी केलं आहे.

'रामो रावण:' ह्या लेखात रावणाच्या वेगळ्याच रुपाची ओळख त्यांनी करून दिली आहे. अतिशय माहितीपूर्ण असा हा सुंदर लेख आहे. रावणाच्या ब्रम्हर्षी, कवी, आयुर्वेद आणि ज्योतिषावरचा ग्रंथलेखक, उत्कृष्ट गायक, वीणा व रावणहत्ता ही वाद्यं निर्माण करणारा आणि छत्तीस रागात सामवेद गाणारा, तसंच चारित्र्यवान, सुसंस्कृत अशा अनेक रुपांची ओळख त्या त्या लेखात करून देतात तेव्हा आपल्या रावणाबद्दलच्या अगोदरच्या माहितीचं तोकडेपण आपल्याला खूपच जाणवतं. त्याच्या दहा तोंडांची दहा वेगळीच रूपं त्या दृष्टीस आणून देतात. अतिशय रंजक असा हा लेख आहे. ह्याच लेखात अगदी सहजपणे अंधश्रद्धेबद्दलही थोडक्यात पण नेमकं त्या बोलतात.

त्यांच्या अग्रलेखांमध्ये अतिशय विविधता आहे. मौनरागामुळे माणूसपण निसटतंय ह्याची खंत त्यांना आणि वाचकांनाही उदास करून जाते. त्यांचे सर्व लेख वाचकाला विचार करायला प्रवृत्त करतात. त्यांच्या लेखांमध्ये त्या त्या वेळच्या सामाजिक परिस्थितीचं, प्रश्नांचं, प्रवृत्तींचं प्रतिबिंब सतत प्रकर्षानं आणि नेमकेपणानं उमटत राहतं. हसण्याचे फायदे नववर्षारंभीच्या लेखात दाखवून नववर्ष हसरं करावं हा सुंदर संदेशसुद्धा त्या देतात. नामदेव ढसाळ यांच्यावरच्या लेखात नामदेव ढसाळ हा माणूस म्हणून कसा होता हे सांगतानाच ढसाळांच्या साहित्याची उंची त्या अशा प्रकारे चित्रित करतात की ती उंची आपसूकच आपल्याला कधी जाणवते व अंतर्मुख करते हे आपल्यालाच कळत नाही. ढसाळांच्या व इतर अनेक साहित्यिक चळवळींशी सुहासिनीताईंचं जवळचं नातं आहे. कुसुमाग्रजांच्या वाढदिवसाचं निमित्त साधून त्यांच्याच काव्यपंक्तींनी परीक्षार्थींना शुभचिंतन करतानाच उत्तरपत्रिका तपासण्यावरचा बहिष्कार आणि क्लासेसच्या युगामधल्याही चांगल्या प्राध्यापकांचं व शिक्षणाचं महत्त्व यावर प्रकाश टाकतात.

मे महिन्यामधल्या वसंतोत्सवात नकळतच आपण जणू प्रत्यक्ष सहभागी होतोय असं वाटायला लागतं. विविध वृक्षवेली, फुलाफळांची ओळख होते. त्याच फुलांचं सौंदर्य स्वत:च प्रत्यक्ष अनुभवतोय असं वाटायला लावणारा हा वसंतोत्सवाचा आरस्पानी लेख आहे. 'रंगीला रे' मध्ये हा रंगप्रत्यय आपण थोडाफार अनुभवलाच आहे.

भ्रूणहत्या हा आत्ताचा ज्वलंत प्रश्नसुद्धा ह्या अग्रलेखांमध्ये डोकावतो. त्यामागची भयाण मानसिकता त्यातून त्या दाखवतात. एक संपादक एक अख्खी वाचकपिढी घडवीत आहे; हीच माझ्यासाठी फार मोठी गोष्ट आहे. त्या सदरलेखनासाठी लेखकांचाही शोध घेतात. 'प्रभुतरुणा'त मी लिहायला लागले दर महिन्याला ती त्यांच्यामुळेच. वर व्यक्त केलेली इच्छा मी वाचकच नव्हे; तर लेखक म्हणूनही व्यक्त करते. नायगांवकरांच्या कविकथनांमधल्या विनोदांमधून हे विदारक सत्य त्यांनी मांडलं आहे. माणूस हा वाचनप्रिय आहेच. मग तो कोणत्याही काळातला असतो. फक्त बदलत्या काळानुसार वाचनाची माध्यमं बदलली. पण वाचनाची आसक्ती तीच आहे. माणसाचं मन तेच वाचनलोलुप राहिलंय. आणि आयुष्यभर वाचूनसुद्धा प्रत्येकाच्या बाबतीत 'वाचनाचा अनुशेष' राहतोच. आयुष्याच्या संध्याकाळी जेव्हा हे लक्षात येतं तेव्हा ती जाणीव वाचनप्रिय माणसाला खूप भयावह वाटते ही भावना हा लेख वाचणाऱ्याच्या मनातही घर करून राहते हे सुहासिनीताईंच्या प्रत्ययकारी लेखाचं फलित आहे.

सुहासिनीताईंच्या वानगीदाखल थोड्या लेखांबद्दल मी माझं मत एकाच लेखात नोंदवलंय - नव्हे - कोंबलंय असंच म्हणावं लागेल. कारण त्यांच्या प्रत्येक संपादकीयवर एक स्वतंत्र खूप मोठा लेख होऊ शकतो; एवढा त्या लेखांचा आवाका मोठा आहे. त्यांचं लेखन चतुरस्त्र असतं. विविध विषयांवरचं त्यांच्या लेखणीचं प्रभुत्व अक्षरागणिक जाणवतं. त्यांचं साहित्य मग ते कोणत्याही स्वरूपात असो; वाचणं हा माझ्यासाठी एक आनंदोत्सवच असतो. प्रत्येक लेखाची सुरुवात व शेवट अत्यंत आकर्षक असतो. तर लेखाचा गाभा त्या विषयाची अनेक अंगे फुलविणारा तर असतोच, पण त्या अनुषंगाने येणाऱ्या विविध विचारांना परिणामकारकरित्या स्पर्श करणारा असतो. मराठी व संस्कृत भाषेवरचं त्यांचं प्रभुत्व थक्क करणारं आहे. प्रत्येक विषयाचा सखोल अभ्यास ही त्यांच्या लेखांची निश्चित बैठक असते. असा हा माहितीचा खजिना ऊर्फ सुहासिनीताई त्यांच्या लेखांमध्ये अजून खूप खूप वर्ष आपल्यासाठी उपलब्ध करवून देवोत आणि ते सुख आपल्याला मिळत राहो हीच प्रबळ इच्छा.

*

## पत्र प्रतिक्रिया

(श्री. विश्वास नारायण अजिंक्य यांचा 'महाराष्ट्र टाइम्स'मध्ये भाऊ रसूलवर लेख आला. त्याबद्दलची प्रतिक्रिया. श्री. विश्वास यांचे अभिनंदन. -संपादक)

माननीय महोदया,

नमस्कार.

दि. २७-७-२०१४ रविवारच्या 'महाराष्ट्र टाइम्स' या वृत्तपत्रात 'आधुनिक मुंबईची अस्सल खूण' या लेखात श्री. विश्वास अजिंक्य यांनी उत्तम माहिती सादर केली आहे.

श्री. विश्वास अजिंक्य यांच्या लेखनाचे कौतुक करण्याकरिता मी हे पत्र पाठवित आहे. आपल्या समाजाचे कै. लक्ष्मण हरिश्चंद्र अजिंक्य म्हणजेच 'भाऊ रसूल' यांच्या कार्याचा योग्यरित्या अभ्यास त्यांनी केला आहेच; पण लेखाची भाषा, मांडणी, टिप्पणी, आखणी ही प्रशंसनीय आहे. मी व माझे श्रीयुत आम्ही वाचक आहोत. असा उत्तम लेख हा आमच्याकरिता नजराणाच असतो.

हा लेख 'प्रभुतरुणा'च्या दिवाळी अंकात जरूर छापावा अशी आग्रहाची विनंती मी करते.

'भाऊ रसूल' यांच्या स्वभावाचा एक एक कप्पा लेखकांनी उदाहरणसहीत व्यक्त केला आहे. त्यामुळे 'भाऊ रसूल' हे किती योग्यरित्या कार्य करणारे समाजप्रेमी होते हे जाहीर होते.

श्रीयुत आंबवणे यांचे असे मत आहे की हा लेख शालेय पाठ्य पुस्तकात अभ्यासाकरिता जरूर निवडावा. या लेखामुळे जुन्या काळातील व्यक्तिंची ओळख व त्यांचे ज्ञान, ज्ञानाची योग्य ठिकाणी समाजाकरिता घेतलेली दखल याची जाणीव आजच्या मुलांना झाली पाहिजे.

'भाऊचा धक्का' ही मुंबईची अविस्मरणीय खूण याची माहिती आजच्या तरुण पिढीला द्यायलाच हवी तसेच पाठारे प्रभु समाजातील सर्वांनाच हे मानाचे प्रतिक मान्य करावे लागेल. असे विचारप्रचूर, अभ्यासपूर्व, माहितीयुक्त लेख श्री. विश्वास अजिंक्य यांनी सातत्याने लिहावेत.

आ.न.

**सौ. गीता श्री. आंबवणे**

भिवंडी

मो. ९८२३७३८३६०

*

## परीक्षेतील सुयश

**एम्. एम्. एस्.**

**(मास्टर ऑफ मॅनेजमेंट स्टडीज)**

कु. यशश्री दीपक नवलकर ४६९/७००, ६७ %

**एस. एस. सी.**

कु. इशानी श्रेयस सेजित ४६६/५००, ९३.२० %

श्री. अमेय निकोलाय कीर्तिकर ४२८/५००, ८५.०६ %

श्री. साहिल प्रशांत देसाई

**सी.बी.एस.सी.**

श्री. आदित्य विवेक तळपदे ६१ %

**आय्.सी.एस्.सी.**

कु. ऐषा अभिजित कोठारे ५४०/६००, ९० %

कु. सिमरन मनीष धैर्यवान, 'ए' ग्रेड

**(कॉमर्स)**

श्री. रोहन नितल तळपदे ६२ टक्के

**एच.एस.सी. सायन्स**

कु. नियोती गिरीजाकांत जयकर. ५१३/६००

**बॅचलर ऑफ आर्किटेक्चर**

श्री. चिन्मय प्रसाद विजयकर, प्रथम श्रेणी

* सोशल समाजाचा वार्षिक अहवाल प्रसिद्ध झाला. तसेच महिला समाजाचाही वार्षिक अहवाल प्रसिद्ध झाला. दोन्ही अहवाल संस्थांची वर्षभराची सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक वाटचाल दाखवतात. या संस्थांचे अभिनंदन.

## प्रभु तरुण आश्रयदाते

१) सौ. विमल व श्री. माधव नायक,
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर,
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि
कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तिकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिंक्य
१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे,
कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर,
कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे
यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व
कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक
३२) कै. सौ. विजया व श्री. प्रकाश माधव नायक या त्यांच्या आईवडिलांच्या स्मृत्यर्थ उन्मेष प्रकाश नायक
३३) सौ. वृंदा आणि श्री. शाम विनायक जयकर

## प्रभुतरुणाची डायरी

### जनन

०२-०७-१४ सौ. आकांक्षा (दीप्ति) आणि श्री. अंबरीश प्रफुल्ल विजयकर, पुत्र, दादर

### नांदा सौख्यभरे

०७-०६-१४ श्री. अभय अनंत राव, कुमारी मिताली नामदेव मेहेर (आं. ज्ञा.)

### विवाह माणिक महोत्सव

२३-०८-१४ सौ. रीटा आणि श्री. मंदार माधव नायक

### मरण

१२-०६-१४ श्री. चंद्रसेन भोलानाथ नवलकर वय, ६५ सायन

## प्रभुतरुणास देणगी

✳ सौ. शील आणि श्री प्रफुल्ल श्रीपाद राणेकडून त्यांना नातू झाल्याप्रीत्यर्थ रु. २५१/-

✳ सौ. वृंदा शाम आणि श्री. शाम विनायक जयकर यांजकडून सौ. वृंदा यांच्या पंच्याहत्तराव्या वाढदिवसाप्रीत्यर्थ 'प्रभुतरुणा'चे आश्रयदाते म्हणून रु. ११०००/-

✳ सौ. रीटा आणि श्री. मंदार माधव नायक यांजकडून त्यांच्या विवाहाच्या माणिक महोत्सवानिमित्त रु. १०००/-

✳ सौ. प्रणिता प्रकाश प्रभाकर यांजकडून प्रभुतरूणाचे आजीव सदस्यत्व रु. ५०१/-

✳ श्री. सुजन राणे यांजकडून रु. १०००/-

✳ सौ. किशोरी आणि श्री. शंकर गजानन त्रिलोकेकर यांचा नातू श्री. रोनित मिलिंद कीर्तिकर हॉटेल मॅनेजमेंट विषयात बी.एससी झाला आणि त्यांचा दुसरा नातू श्री. राजदीप प्रसाद त्रिलोकेकर याला 'यू.एस. प्रेसिडेन्शियल स्कॉलर ॲवॉर्ड, मिळाले. या दोन्ही नातवांच्या यशाप्रीत्यर्थ सौ. किशोरी आणि श्री. शंकर त्रिलोकेकर यांजकडून रु. ५००/-

✳ सौ. शोभा आणि श्री. रंजन खंडेराव विजयकरकडून त्यांचा नातू चि. अयान जयदीप विजयकर यांच्या व्रतबंधानिमित्त रु. ५०१/-

✳ श्री. नंदकुमार यांच्या पंच्याहत्तराव्या वाढदिवसाप्रीत्यर्थ सौ. सुहास नंदकुमार विजयकरकडून सप्रेम भेट रु. ५०१/-

✳ श्री. सदानंद गजानन देसाई यांच्या स्मरणार्थ श्री. आणि सौ. प्रतिभा जगदीश कीर्तिकरकडून रु. १००१/-

✳ श्री. वसंत आनंदराव धराधर आणि श्रीमती उषा वसंतराव धराधर यांच्या स्मरणार्थ श्री. आणि सौ. प्रतिभा जगदीश कीर्तिकरकडून रु. २००१/-

सर्व देणगीदारांचे आभार.

## अभिनंदन

✳ सह्याद्री वाहिनीतर्फे सिनेनाट्य-क्षेत्रातील कलावंतांना पारितोषिके देण्यात आली. रवीन्द्र नाट्य मंदीर येथे झालेल्या या सोहळ्यात चित्रपटसृष्यीतील लक्षणीय योगदाना-बद्दल श्री. महेश अंबर कोठारे यांना विशेष गौरविण्यात आले. अभिनंदन.

✳ सध्या गाजत असलेल्या 'अनवट' या गूढरम्य चित्रपटात श्री. आदिनाथ कोठारे आणि उर्मिला कानेटकर यांच्या प्रमुख भूमिका आहेत.

✳ सौ. दीप्ति तळपदे यांची निर्मिती असलेला आणि श्री. श्रेयस तळपदे यांनी सादर केलेला 'पोश्टर बॉईज' चित्रपट दिमाखात दाखल झाला. आदिनाथ, श्रेयस या तरूण पिढीच्या प्रतिनिधींनी चित्रपटसृष्टी अशीच उत्तरोत्तर काबीज करावी. अभिनंदन.

✳ मृदुला प्रभुराम जोशी यांच्या 'अभिजन प्रियजन' या पुस्तकाची दखल दूरदर्शनच्या 'अमृतवेल' सदरात रविराज गंधे यांनी घेतली. अभिनंदन.

✳ 'झी' वाहिनीवरील 'आम्ही सारे खवय्ये' मध्ये डॉ. वैशाली नारायण अजिंक्य यांनी आपल्या पाककृती सादर केल्या. प्रशांत दामलेबरोबर सादर झालेल्या या कार्यक्रमात त्यांच्या संग्रही असलेला ९० वर्षांपूर्वीचा 'लाडूबाप्पाचा' डबाही दाखविण्यात आला.

✳ सारस्वत बँकेच्या व्यवस्थापकपदी असलेल्या सौ. उर्वशी धराधर खार रोटरी क्लबच्या २०१४-१५ या वर्षाकरिता अध्यक्ष झाल्या. 'मुंबई सकाळ' मध्ये त्यांचे अर्थाजन सदरही चालू आहे. अभिनंदन.

✳ १८९५ मध्ये प्रथम विमानोड्डाणाचा प्रयोग करणाऱ्या श्री. शिवकर बापूजी तळपदे यांच्या जीवनावर आधारीत 'हवाईजादा' हा चित्रपट येऊ घातला आहे. त्याचे स्वागत.

✳ सौ. योगिनी फणीन्द्र सुमंत तळपदे यांना मुंबई एअर इंडिया कार्गो सेक्शनच्या सर्वोत्कृष्ट सेवेबद्दल गौरविण्यात आले. अभिनंदन.

✳ सौ. बेला कुंदन आगासकर यांची मॅनेजरपदी नियुक्ती झाली. अभिनंदन.

✳ कु. वैजयंती विश्वास अजिंक्य ही महाराष्ट्र राज्य शूटिंग स्पर्धेत विजेती ठरली. अभिनंदन.

✳

## भावांजली

श्री. चंद्रदत्त भोलानाथ नवलकर माझ्या चुलत मावशीचा सुपुत्र. डॉ. उषा (प्रकाशिनी) या माझ्या आईबरोबर खामगावच्या घरात एकत्र वाढलेल्या, खेळलेल्या. पूर्वी ज्ञातीसंस्थेतर्फे रामरक्षापठनाच्या स्पर्धा होत. मी जेव्हा शाळकरी होते तेव्हा या स्पर्धेत भाग घेतल्याचे आठवते. या स्पर्धेत हिरीरीने भाग असायचा 'बाबा'चा म्हणजे चंद्रदत्तचा. कारण रोजच्या पठनसंस्कारात डॉ. भोलानाथ सुं. नवलकर यांच्या घरी रामरक्षा म्हटली जायची. बाबा हुशार. चळवळ्या. योगायोग असा की मी ६६ साली एम्.ए. होऊन लगेचच एलफिन्स्टन महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून रुजू झाले त्याच वर्षी 'बाबा' याच महाविद्यालयात विज्ञानशाखेचा विद्यार्थी म्हणून दाखल झाला. माझ्या ज्ञानदानाच्या पहिल्या वर्षीचा माझा विद्यार्थी! विज्ञानशाखेत मराठी हा विषय होता; पण टक्केवारीत त्याचे गुण धरले जायचे नाहीत. त्यामुळे या विद्यार्थ्यांना मराठीचा तास म्हणजे अभ्यासाचा ताण न ठेवता केलेले मनोरंजनच. या मनोरंजनात चंद्रदत्त हुडपणे सहभागी असायचा. पुढे तो धनबादला 'मायनिंग इंजिनियर' व्हायला गेला. मग नोकरी. या सगळ्यात त्याच्या कर्तृत्वाचा आलेख उंचावत गेला. कोकण रेल्वे प्रकल्प, महाबळेश्वर-पाचगणी पठाराच्या संरक्षणाचे प्रकल्प आदी अनेक कामात हा पाठारे प्रभु ज्ञातीयभूषण ठरला. पाठारे प्रभु चॅरिटीजच्या विद्यार्थी गौरवात तो प्रमुख पाहुणा म्हणून आला असताना त्याने आपल्या भाषणात या कर्तृत्वाचा पाढाच वाचला. अतिशय अभिमानाने. पण शेवटी 'पराधीन आहे जगती पुत्र मानवाचा'! गेल्या महिन्यात त्याने पत्नीवियोगाचे दुःख पेलले. ते पेलवेनासे झाले म्हणून की काय; त्याला देवाज्ञा झाली. त्याच्या जाण्याने झालेल्या कुटुंबीयांच्या विरहवेदना 'प्रभुतरुण' सहानुभव ठेवून समजू शकतो. त्यांना दुःख पेलण्याचे बळ लाभो.

✳

**खास पाठारे प्रभूंचा ताशा**
मुंजी, लग्न, वरघोडा आणि
वरातीसाठी संपर्क:-
**श्री. मंगू ताशेवाला**
मोबाईल नं.:
९९२०५८२२६५/९९३०८३८६९९
पत्ताः
खोली क्र. ७, पहिला
मजला,(जयश्री मसाला वर),
बिल्डिंग नं. ६७/६९,
कामाठीपुरा ७वी गल्ली,
एम. आर. रोड, मुंबई-४००००८

हे मासिक मुद्रक, प्रकाशक श्रीमती सुहासिनी कीर्तिकर यांनी मालक बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुण करिता मे. स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ, शाह अँड नाहर इंडस्ट्रीयल इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०००१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४००१०२ येथे प्रकाशित केले.

संपादक: श्रीमती सुहासिनी कीर्तिकर RNI NO. 14613/67